MHRG070004422026

**फौजदारी चौकशी अर्ज क्र.६१/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार **श्री.नितीन वासुदेव अहिर**, राहणार –गारपोली, पो. कोषाणे, ता.कर्जत, जि. रायगड , ४१०२०१ यांचे कर्जत पोलीस स्टेशन गुन्हा नोंदणी क्रं. १४७/२०२६ मधील जप्त मुद्देमाल मध्ये होल्ड केलेली रक्कम परत मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांचे मोबाईल नंबर वर दिनांक २६/०२/२०२६ रोजी एका अज्ञात व्यक्तीने RTO-APK अशी फाईल पाठविली. सदरची फाईल अर्जदार यांनी डाऊनलोड करुन ओपन केली असता फाईलमध्ये काहीही दिसून आले नाही. त्यानंतर दिनांक २७/०२/२०२६ रोजी अर्जदार यांचे फर्मच्या खात्यातून पाच लाख दोन वेळा असे एकूण दहा लाख वजा झाल्याचे मेसेज आले. त्यावेळेस अर्जदार यांनी बँकेच्या मॅनजेरला सांगून सदरील रक्कम फ्रिज केली. त्यानंतर अर्जदार यांचे खाते सुध्दा फ्रिज करण्यात आले आहे. त्याबाबत अर्जदार यांनी कर्जत येथील पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. सदरील खाते हे अर्जदार यांचे व्यावसायिक खाते असून ते नेहमीच्या वापरातील खाते आहे. खाते बंद राहिले तर त्यांचे अपरिमीत नुकसान होईल. अर्जदार यांचे सारस्वत बँक, शाखा– बदलापूर येथील खाते क्रं.८१०००००००००८५८६ या खात्यातून ऑनलाईन पध्दतीने वळते केलेल्या रक्कमेपैकी गोठविण्यात आलेली रक्कम अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावी.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार, कर्जत पोलीस स्टेशन यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे म्हणणे दाखल केले आहे की, सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रक्कम ही फिर्यादीचे मालकीचे असलेबाबतचा पुरावा दाखल आहे. सदर जप्त मुद्देमाल रक्कम ही सदर गुन्हा शाबीतीसाठी महत्त्वाचा पुरावा आहे. सदर मुद्देमाल परत केल्यास तो खर्च करण्याची शक्यता आहे. सदर पुरावा रक्कम खर्च केल्यास सदर गुन्हा शाबीतीसाठी अडथळा निर्माण होईल. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार, कर्जत यांनी असे म्हणणे दाखल केले आहे की, सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीत यांनी फिर्यादी यांच्या बँक खात्यामधून बेकायदेशीरपणे वळती केलेल्या रक्कमेपैकी १,९९,००१/- रुपये इतकी रक्कम बंधन बँकेचे अकाऊंट नंबर २०२००१३७६१०९३६ मध्ये लीन करण्यात आलेली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदरील १,९९,००१/- रुपये इतकी रक्कम फिर्यादी यांना परत करण्यास काहीही हरकत नाही.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी कर्जत पोलीस स्टेशन एफआयआर नं.१४७/२०२६ ची झेरॉक्स प्रत, अर्जदार यांच्या सारस्वत बँक, शाखा- बदलापूर खाते क्रं. ८१००००००००८५५६चे बॅक स्टेटमेंटची प्रत, अर्जदाराचे आधारकार्डाची साक्षंकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०५. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | कर्जत पोलीस स्टेशन गुन्हा नोंदणी क्रं. १४७/२०२६ मधील अर्जदार यांचे सारस्वत बँक, शाखा– बदलापूर येथील खाते क्रं. ८१०००००००००८५८६ या खात्यातून ऑनलाईन पध्दतीने वळती झालेली एकुण रक्कम रुपये १,९९,००१/– (अक्षरी रक्कम एक लाख नव्यान्नव हजार एक रुपये मात्र) ही रक्कम अर्जदार **श्री.नितीन वासुदेव अहिर**, यांना रक्कम रुपये १,९९,००१/– (अक्षरी रक्कम एक लाख नव्यान्नव हजार एक रुपये मात्र) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावी. सदरची रक्कम अर्जदार यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. |
| ३. | जप्त रक्कम ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास अर्जदार यांनी सदरची रक्कम परत करावी. |
| ४. | अर्जदाराने सदर रक्कम ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत कर्जत पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.06.19 18:52:16 +0530

कर्जत.
दिनांक : १९/०६/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड